परिपत्रक क्र.५९

रयत शिक्षण संस्था,सातारा
आस्थापना विभाग
ता.९-२-२०१७

सर्व शाखाप्रमुख,
माध्यमिक विद्यालये,
रयत शिक्षण संस्था,सातारा

यांना ------

विषय :- सेवानिवृत्त होणा-या मुख्याध्यापकांच्या पेन्शन प्रस्तावाबाबत

रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक विद्यालये, माध्यमिक विद्यालये,अध्यापक विद्यालये व माध्यमिक विद्यालयास जोडून असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात मुख्याध्यापकाची जबाबदारी पार पाडून नियत वयोमानानुसार ते सेवानिवृत्त होत असतात. मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या कालावधीमध्ये त्यांचे हातून आर्थिक व्यवहारातील येणे-देणे अपूर्ण राहणे, ऑडिट पूर्तता वेळेवर न करणे अशा बाबी घडल्याने शाखा व संस्थेकडून ना देय दाखला देण्यास विलंब होतो. वरील कारणास्तव सेवानिवृत्त होणा-या व झालेल्या मुख्याध्यापकांचे पेन्शनप्रस्ताव शिक्षण खात्याकडे वेळेत सादर होत नाहीत.

वरील विषया संदर्भात संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सीलमध्ये चर्चा होवून सेवानिवृत्त होणा-या मुख्याध्यापकांचे पेन्शन प्रस्ताव सहा महिने अगोदर सादर करण्यांत यावेत व यासाठी त्यांचेकडून येणे देणे व्यवहार पूर्ण करण्यासाठी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेण्यांत यावे. सोबत हमीपत्राचा नमुना जोडलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

रयत शिक्षण संस्था सातारा

सहसचिव,(माध्य)
रयत शिक्षण संस्था,सातारा

सोबत हमीपत्राचा नमुना
प्रत माहितीसाठी
१. मा.सचिव ,रयत शिक्षण संस्था,सातारा
२. मा.सहसचिव ,(उच्च शिक्षण) रयत शिक्षण संस्था,सातारा
३. मा.ऑडिटर,रयत शिक्षण संस्था,सातारा
४. सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था,सातारा

<u>प्रतिज्ञापत्र</u>

**लिहून देणार :**

**लिहून घेणार : मा. सहसचिव(माध्यमिक),रयत शिक्षण संस्था,सातारा**

लिहून देणार श्री / सौ / श्रीमती … … … … … … … … … … … … … … … … … … … (मुख्याध्यापक) असे प्रतिज्ञापत्र लिहून देतो /देते की, मी संस्थेत … … … … … … पासून उपशिक्षक /उपशिक्षिका व मुख्याध्यापक /मुख्याध्यापिका म्हणून … … … … … … … … … … … … … … … … … … … … … … …या शाखेमध्ये … … … … … …या दिंनाकापासून काम करीत आहे. मी नियत वयोमानानुसार संस्थेच्या सेवेतून ता. … … … … … … रोजी सेवानिवृत्त होत आहे. शासन नियमानुसार सहा महिने पेन्शनच्या कागदपत्राची पूर्तता करणे आवश्यक असते. असे असलेतरी मी मुख्याध्यापक म्हणून काम केलेल्या शाखामध्ये व सध्या कार्यरत असलेल्या शाखेमध्ये ऑडिट पूर्तता व शाखेतील येणे-देणे व्यवहार अपूर्ण राहिल्यास त्यास मी मुख्याध्यापक /मुख्याध्यापिका म्हणून व्यक्तीशः जबाबदार आहे.

सबब, माझा पेन्शन प्रस्ताव शासनाकडे पाठवावा व माझेकडे जे आर्थिक येणे देणे निघेल ते मी पेन्शन मंजूर होणेपूर्वी पूर्ण करीन त्याशिवाय मला माझी पेन्शन व ग्रॅच्युईटी मिळणार नाही याची मला जाणीव आहे, माझे येणे देणे अपूर्ण राहिलेस ते माझ्या बॅक ठेव / प्रॉ.फंड / ग्रॅच्युईटी / रजा रोखीकरणातून वसूल करणेबाबत मी हमी देत आहे, असे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देत आहे.

हे प्रतिज्ञापत्र मी राजीखुषीने व कोणत्याही दबावाला बळी न पडता लिहून देत आहे.

**लिहून देणार :**

**लिहून घेणार :**

ठिकाण :
दिनांक :